# भारतातील उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने: एक आढावा

**कांचन जाधव** सहाय्यक प्राध्यापक कमला कॉलेज, कोल्हापूर

---

## प्रस्तावना

शिक्षण ही मानवी आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची गरज आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा प्रेरक स्त्रोत आहे. त्यामुळेच मानवी जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे आणि म्हणूनच "ज्या शिक्षणातून ज्ञानशक्ती, संस्कारक्षमता आणि कार्यप्रवणता प्राप्त होते व वाढते तेच खरे शिक्षण"(वाघमारे, १९९३). अशी शिक्षणाची व्याख्या करता येईल. कोणत्याही समाजातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तन हे शैक्षणिक परिवर्तनावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. कारण सामाजिक परिवर्तन शिक्षणाशिवाय घडू शकत नाही आणि सामाजिक परिवर्तनाशिवाय आर्थिक विकास होत नाही. त्यामुळे शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक परिवर्तन आणि देशाचा विकास यांचा सहसंबंध आहे. म्हणूनच शिक्षण व्यवस्था बदलली की समाजातील मूल्य, विचार, संस्कृती, रोजगार यामध्ये अमूलाग्र बदल घडून येतात. त्यामुळेच कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य आणि विद्यार्थ्यांना सक्षम बनवणारी शिक्षण व्यवस्था अनिवार्य घटक आहे. त्यामुळेच भारतासारख्या विकसनशील देशामध्ये देखील प्राचीन काळापासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत शैक्षणिक परिवर्तन झाले. परंतु भारतीय समाजामध्ये शिक्षण हे कशा प्रकारचे आणि कुणासाठी? याविषयी कायमच मतभेद राहिले. तरीदेखील येथील शैक्षणिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्याच्या प्रगतीसाठी अनेक नवनवे विचार, प्रयोग करण्यात आले.

त्यामुळेच भारतासारख्या विकसनशील देशाचा सद्यकाळातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास बघत असताना येथील शिक्षण व्यवस्थेतील स्थित्यंतरे बघणे तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणूनच सदर लेखामध्ये भारतातील शैक्षणिक परिवर्तन व विशेषत: उच्च शिक्षणातील परिवर्तन व त्यातील आव्हानांचा आढावा घेण्यात आला आहे. सदर लेखामध्ये दुय्यम स्त्रोतांच्या आधारे माहितीचे संकलन करून विश्लेषण करण्यात आले आहे.

## भारतातील शैक्षणिक धोरणे: ऐतिहासिक आढावा

साधारणत: शिक्षण हे देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे आणि ते देशाच्या सर्वांगीण विकासाला पोषक ठरले पाहिजे या उद्देशाने शैक्षणिक धोरणे आखली जातात. भारतातील शैक्षणिक स्थित्यंतरांचा आढावा घेत असताना भारतीय शिक्षण पद्धतीला प्रदीर्घ इतिहास असल्याचे आढळून येते. कारण भारतीय संस्कृती, परंपरा, भारतातील ब्रिटिशांचे वास्तव्य आणि ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा कालखंड आणि आजचे आधुनिक तंत्रज्ञानात्मक युग या सर्वच कालखंडांचा परिणाम भारतातील शिक्षण पद्धतीवर झालेला दिसून येतो. किंबहुना याच कालखंडामध्ये भारतीय शिक्षण पद्धती आकाराला आली.

प्राचीन काळापासून भारताने शिक्षण व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. नालंदा, तक्षशिला, विक्रमशीला आणि वल्लभि या भारतातील प्राचीन विद्यापीठांना शिक्षणाचा समृद्ध वारसा लाभलेला होता. या विद्यापीठांनी उच्चशिक्षणासाठी कोरिया, तिबेट, नेपाळ यांसारख्या देशातील विद्वानांना आकर्षित केले. या वैदिक कालखंडातील शिक्षण पद्धतीला बौद्ध परंपरेचा समृद्ध वारसा लाभला. तसेच हिंदू धर्मातील वेद, उपनिषदे यांचा प्रभाव शिक्षण व्यवस्थेवर असलेला दिसून येतो. त्यानंतर या भारतीय शिक्षण पद्धतीवर ब्रिटिश कालखंडामध्ये आमुलाग्र बदल झाले. या कालखंडामध्ये पाश्चात्य आणि इंग्रजी शिक्षण पद्धतीवर अधिक भर देण्यात आला. त्यामध्ये ख्रिश्चन मिशनरी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सन १८०० मध्ये लॉर्ड वेल्सली यांनी फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली आणि इंग्रजी शिक्षणाचा पाया रोवला. परंतु भारतीय समाजात त्यांच्या प्रशासनाच्या देखरेखीसाठी इंग्रजांनी तयार केलेला शिक्षण पद्धतीचा प्रसार करणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. त्यानंतर सन १८५७ मध्ये कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास या तीन आधुनिक विद्यापीठांची निर्मिती झाली. त्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली भारतीय उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. याच कालखंडात भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या अनुषंगाने विविध समित्या व आयोगाची निर्मिती केली गेली. उदाहरणार्थ University Education

Commission (1948), University Grants Commission (1956), Kothari Commission (1964-66), (सेन, २०१६).

कोठारी आयोगाने प्रथमतः शैक्षणिक प्रश्नांचा संबंध सामाजिक परिवर्तन व राष्ट्रीय विकासासोबत जोडला. सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रीय विकास घडून आणण्यासाठी शिक्षण प्रणालीचे महत्व नमूद केले. तसेच शिक्षण विषयक प्रश्न सामाजिक, आर्थिक व राजकीय घटनांशी संबंधित आहे या विषयक मांडणी या आयोगाने केली. कोठारी आयोगाने इतर विद्यापीठांच्या संशोधन विकासाची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी आणि संलग्न महाविद्यालय अभ्यासक्रम आणि परीक्षांच्या पुनर्रचनेद्वारे अध्यापन आणि मूल्यमापनात सुधारणा सुनिश्चित करण्यासाठी व स्त्री शिक्षणासाठी, प्रमुख विद्यापीठासाठी शिफारस केली. कोठारी कमिशन अहवालाचा आधार घेऊन सन १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारले गेले. त्यानंतर सन १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनी नमूद केले की, शिक्षणावरील राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट केवळ अर्थव्यवस्थेची सेवा करण्यासाठी मनुष्यबळ विकसित करणे नव्हे तर महत्त्वपूर्ण मूल्य विकसित करणे हे आहे (पोवार, २००२).

१९८६ च्या धोरणाने उच्च शैक्षणिक संस्थांचा विस्तार, स्वायत्त महाविद्यालयांचा विकास, अभ्यासक्रमांची पुनर्रचना, दर्जेदार संशोधन, शिक्षकांचे प्रशिक्षण, संस्थांमधील गतिशीलता वाढविण्याच्या शिफारशीद्वारे उच्च शिक्षण प्रणालीमध्ये सुधारणा केली. त्यानंतर या धोरणामध्ये आणखी सुधारणा करून सन १९९२ मध्ये जनार्दन रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली समितीने विविध उपायांद्वारे उच्च शिक्षणाचा नियोजनबद्ध विकासाची शिफारस केली. १९९२ च्या कृती आराखड्यात सर्वसाधारणपणे वंचित गटांच्या क्षमतेच्या विस्तारासाठी निर्देशित केलेल्या योजना आणि कार्यक्रमांचा समावेश होता. तथापि या सर्व समित्यांमधून उच्च शिक्षण विषयक तरतुदी दुर्लक्षित होत्या. सन २००६ मध्ये नॅशनल नॉलेज कमिशन ने सन २०१५ पर्यंत उच्च शिक्षणाचा किमान १५ टक्के विस्तार करण्याची शिफारस केली आणि सन २०१४ मध्ये मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाने उच्च शिक्षणातील सुधारणा घडवून आणण्यामध्ये पुढाकार घेतला. त्यानंतर भारत सरकारने टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती स्थापना केली. या समितीने सन २०१६ मध्ये अहवाल सादर केला. त्यामध्ये मुख्यतः १. उच्च शिक्षणातील सहभाग, २. अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धतीची पुनर्रचना, ३. शिक्षणाचा दर्जा, ४. शिक्षकांचा विकास आणि व्यवस्थापन, ५. कौशल्य विकास आणि रोजगार या मुद्द्यांवर मांडणी करण्यात आली. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये उच्च शिक्षणातील गुंतवणुकीवर, १३% ने वाढ करण्यात आली. तसेच GIAN (Global Initiative of Academic Network) या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण जगभरातील शिक्षण तज्ञांना निमंत्रित केले गेले. तसेच मानवी संसाधन आणि विकास मंत्रालयाने स्वयं कार्यक्रमांतर्गत भारतातील नागरिकांना ऑनलाइन शिक्षण देण्याच्या उद्देशाने Massive Open Online Course (MOOC) सारख्या ऑनलाइन कोर्सेसचे आयोजन केले. अशा प्रकारे या टप्प्यावर भारत सरकारने शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाची जोड देण्यास सुरुवात केली (सेन,२०१६).

अशा तऱ्हेने भारतात प्राचीन कालखंडापासून ते एकविसाव्या शतकापर्यंत उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये कालानुरूप आमूलाग्र बदल केले गेले. त्यामध्ये भारत सरकार व राज्य सरकारने नवनवे प्रयोग, उपक्रम राबवून उच्च शिक्षणाच्या स्थितीचा दर्जा टिकून ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**भारतातील उच्च शिक्षणातील सद्यस्थिती आणि आव्हाने**

सद्यकाळामध्ये भारतातील उच्च शिक्षणातील केंद्रे वाढत आहेत. यूजीसीच्या २०२३ मधील अहवालानुसार भारतात १,११३ विद्यापीठे, ११,२९६ खाजगी संस्था व ४३,७९६ महाविद्यालये स्थापन झाली आहेत.

मात्र सातव्या पंचवार्षिक योजनेपासून उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले गेले नसल्याचे दिसून येते. याचा परिणाम उच्च शिक्षणाची अनियमित वाढ, उच्च शिक्षणातील सर्वसमावेशकता, गुणवत्ता यावर झाला. लिंग, जात आणि धर्माच्या आधारे उच्च शिक्षणाच्या प्रवेशातील असमानता वाढली आणि उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये आंतर-संस्थात्मक फरक लक्षणीयपणे दिसू लागला (प्रकाश, २००७).

तसेच सद्यकाळात भारतातील शिक्षणव्यवस्था विरोधाभासी अवस्थेत असलेली दिसते. एका बाजूला आयआयएम आणि आयआयटी सारख्या जागतिक पातळीवरील उच्च संस्था भारतात आहे तर दुसऱ्या बाजूला बऱ्याच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्राथमिक सोयीसुविधांचा अभाव आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५वर्षे झालेली असली तरी वैश्विक शैक्षणिक पातळीपासून भारत मागे असलेला दिसून येतो (सेठी, २०१९). सन २०२०-२१ मधील भारतातील उच्च शिक्षणातील GER निर्देशांक २७.१% इतका नोंदवला गेला आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत हा निर्देशांक फारच कमी असलेला दिसून येतो. त्यामुळे इतर देशांच्या बरोबरीने येण्यासाठी व देशाच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च शिक्षणातील अपेक्षित निर्देशांक पातळीपर्यंत पोहोचणे हे भारतातील उच्च शिक्षणातील आव्हान आहे.

भारतातील शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या खाजगीकरणाचा परिणाम उच्च शिक्षणावर होत आहे. या खाजगीकरणाच्या धोरणानुसार विद्यार्थ्यांकडे ग्राहक या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. त्यामुळे आजच्या शिक्षण व्यवस्थेला व्यापारीकरणाचे स्वरूप आलेले दिसते. तसेच उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करीत असताना त्यातील सरकारी गुंतवणूक अधिकाधिक कमी केली जात आहे. निर्णय प्रक्रियेचे केंद्रीकरण, प्राध्यापकांच्या स्वायत्तेवर मर्यादा इत्यादी सद्यकाळातील उच्च शिक्षणातील आव्हाने आहेत. भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये खाजगी उच्च शिक्षण संस्था अधिक आहे. त्यामुळे या राज्यांमध्ये स्थलांतरित विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे आणि त्याचबरोबर त्या विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षणिक प्रश्नही वाढत आहेत. तसेच सद्यपरिस्थितीत देशातील उच्च शिक्षणाची गती वाढत असली तरी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधील उच्च शिक्षणाच्या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये असमानता आहे. याच खाजगीकरणामुळे असमानता वाढत आहेत. अपुऱ्या पायाभूत सुविधा, शिक्षक भरतीस विलंब, भ्रष्टाचार, फी वाढ असली तरीही दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या खाजगी शैक्षणिक संस्था ही नवी आव्हाने आजच्या शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे निर्माण झालेली आहे. त्यामुळे उच्च शिक्षण हे चांगली मूल्य निर्मिती व सर्वांगीण विकासाचे साधन न बनता व्यापाराचे केंद्र बनले आहे (जोशी, २०२२).

भारतातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये गुणवत्ता नसल्याचे दिसून येते. गेल्या काही वर्षात विद्यापीठांची संख्या अनेक पटींनी वाढली आहे. उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची संख्या वाढत आहे परंतु तरीदेखील येतील बहुतेक पदवीधरांना नोकरी किंवा रोजगार मिळण्यात अडचणी येत असल्याचे दिसून येते (सेठी, २०१९).
आजच्या उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये काळाशी सुसंगत असे अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती राबविण्याचे मुख्य आव्हान आहे. तसेच अध्यापन करणारे गुणवत्ताधारक व प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्याचे देखील आव्हान आहे. अध्यापकांची रिक्त पदे आणि कंत्राटी पद्धतीने भरती यामुळे शैक्षणिक दर्जा खालावत आहे. त्यामुळे शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे व तसेच अधिकाधिक संशोधनासाठी निधी निर्माण करणे हे देखील आजच्या उच्चशिक्षणासमोरील आव्हान आहे (मोरे,२०२०).

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी तेथील शिक्षण पद्धती सर्व समावेशक असावी. उच्च शिक्षणातील खाजगीकरण, बदलती आर्थिक व्यवस्था यामुळे आजचे शिक्षण सर्वसामान्य लोकांच्या आवाक्या बाहेर जात आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल, वंचित गटातील विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडत आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व टिकवून ठेवणे हे देखील आजच्या उच्च शिक्षणातील आव्हान आहे.

**समारोप**

अशाप्रकारे भारतातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने असलेली दिसतात. या आव्हानांचा विचार करून भारतातील उच्च शिक्षण विषयक धोरणे ठरवणे काळाची गरज आहे. कारण उच्च शिक्षण देशाच्या प्रगतीसाठी व २१ व्या शतकातील ज्ञानावर आधारित समाज घडविण्यामध्ये महत्त्वाचा घटक आहे. तसेच एकूण देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी व देशातील प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची:**

1. More, D. (2020). *Koronottar uccha shikshnatil aavhane aani sandhi*. Sakal Newpaper. 25 June 2020.
2. Joshi, M. (2022). *Uccha shikshnache Khajakikaran*. Marathi Vishvakosh.
Retrived from: https://marathivishwakosh.org/61502/
3. Powar, K. (2002). Indian Higher Education. Concept Publishing Company.New Delhi
4. Prakash, V. (2007). Trends in growth and financing of higher education in India. *Economic and Political Weekly*, 3249-3258.
5. Sen, D. (2016). Higher education policies the Indian experience since independence. *International Journal of Multidisciplinary Education and Research, 1 (10)*.
6. Sethi, B. N. (2019). Higher Education in the 21st Century: Issues and Challenge.
7. Sheikh, Y. A. (2017). Higher education in India: Challenges and opportunities. *Journal of Education and Practice*, *8*(1), 39-42.
8. Waghmare, J. (1993). *Aajache Shikshan: Swapna aani Vastav*. Suresh Agency. Pune.